30 DEC 2023

जनसंपर्क कक्ष

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अन्वेषण'मध्ये तंतूमुळांपासून भांडी, स्लीपिंग बॅग्ज, पॅडही

## संशोधन महोत्सव : ११ विद्यापीठांतून ६४ संशोधन प्रकल्प

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी दोनदिवसीय पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सव-२०२३ ला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.

या महोत्सवात अळंबीच्या साक्यापासून थ्री-डी प्रिंटिंग, गवत व तंतूमुळांपासून भांडी निर्मिती, ऑटो कम्पोस्टेबल सॅनिटरी पॅड, ग्रामीण भागातील बालकांसाठी स्लीपिंग बॅग्ज असे नानाविध प्रकल्पांमुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञाशांचा प्रत्यय आला. भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसंचालक व 'अन्वेषण'चे निमंत्रक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि एआययूच्या सहायक संचालक डॉ. उषा राय नेगी यांच्या प्रमुख उपस्थितीत या महोत्सवाचे उद्घाटन झाले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित अन्वेषण संशोधन महोत्सवातील संशोधन प्रकल्पाची कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी संशोधकांकडून माहिती घेतली. यावेळी डॉ. अमरेंद्र पाणी, डॉ. उषा राय नेगी, डॉ. कविता ओझा उपस्थित होते.

राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या महोत्सवाचे आयोजन केले आहे. पश्चिम विभागामधील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान या पाच राज्यांतील ११ विद्यापीठांनी महोत्सवात सहभाग घेतला असून, त्यांनी ६४ संशोधन प्रकल्प सादर केले. महोत्सवात १०८ संशोधक विद्यार्थी सहभागी झाले असून, त्यात विद्यार्थिनींची संख्या ४५ इतकी आहे.

बायोसेन्सर्स, ऑटोमेटेड कापणीयंत्रे, जिव्हास्पर्शावर चालणारी खुर्ची, अत्याधुनिक तंत्राधारित कांदाचाळ, पाइपलाइनमधील बिघाड शोधणारे उपकरण, विजेचे प्रिपेड मीटर, वीजचोरी ओळखणारे थेफ्ट डिटेक्टर, थिन फिल्म डिपॉझिशन, औषधी सुगंधी मेणबत्ती, अळंबीपासून थ्री-डी प्रिंटिंग, गवत, आदी कामे झाली आहेत.

30 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आयोजन : महोत्सवाचा समारोप

# दोन दिवसीय 'अन्वेषण' स्पर्धेत महाराष्ट्रातील विद्यापीठांची आघाडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात एआययू, संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे आयोजित दोन दिवसीय 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सव-२०२३च्या विविध गटांमध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेत महाराष्ट्रातील विद्यापीठांनी बाजी मारली. या महोत्सवाचा समारोप भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसंचालक व संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या उपस्थित झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. एआययूच्या सहायक संचालक डॉ. उषा राय नेगी आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते. डॉ. कविता ओझा यांनी स्वागत केले. डॉ. कबीर खराडे यांनी अहवाल वाचन केले. तृप्ती भापकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजयकुमार कुंभार यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय अन्वेषण संशोधन महोत्सवातील विविध गटांतील विजेत्यांसमवेत भारतीय विद्यापीठ महासंघाचे डॉ. अमरेंद्र पाणी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. उषा राय नेगी, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कविता ओझा उपस्थित होते.

### महोत्सवातील विजेते

सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे : प्रथमेश पंडित खेडकर (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), गौरव पांडे, ऋतुजा जगतकर, स्नेहा कुमारी, गिन्नी केवलरमाणी (मुंबई विद्यापीठ, मुंबई), हर्षाली राठोड, शिवानी नरसीकर, प्रेम बिडवे (एम.जी.एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर).

आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे : सोपान नांगरे, (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), मानस मोरेश्वर महाले (मुंबई विद्यापीठ, मुंबई), अनुष्का शिंदे, श्रेया लोहकरे, निखिल मराठे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे).

मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान : सर्गुण तुषार बासराणी (डी. वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर), अवंती पुराणिक, श्रावणी निघोत, प्रज्ञा मगदूम (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), सुरजीत घनश्याम अडगळे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान : लीना चौधरी (डी. वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर), टोनी थॉमस, जस्टिना चतुर्वेदी, राझी शेख (डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई), दीपकुमार पटेल, मानन पटेल, झील पटेल, हिलाय पटेल (गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात).

कृषी व संलग्न क्षेत्रे : ओम मनोज यादव (मुंबई विद्यापीठ, मुंबई), शंकर मोरे, साईनाथ सूर्यवंशी (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), भाविक चौधरी, ध्रुव सोनी, मितकुमार पटेल, साहील अमीन (गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात).

आंतरविद्याशाखीय संशोधन : नामदेव ठोंबरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), संकेत पवार, दीपांशू शर्मा (एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर), तेजस पाटील (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव). अशी विजेत्यांची नावे आहेत.

30 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकीय दृष्टिकोन रुजविण्यामध्ये 'अन्वेषण' उपयुक्त

## डॉ. अमरेंद्र पाणी; शिवाजी विद्यापीठात अन्वेषण संशोधन महोत्सवाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशभरातील तरुणाईमध्ये संशोधकीय दृष्टिकोन व सृजनशीलता यांना चालना देण्यामध्ये अन्वेषण संशोधन महोत्सव उपयुक्त ठरत आहे, असे प्रतिपादन भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसंचालक व संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. अमरेंद्र पाणी यांनी केले.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित अन्वेषण संशोधन महोत्सवातील विजेत्यांसमवेत डॉ. अमरेंद्र पाणी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. उषा राय नेगी, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कविता ओझा आदी.

शिवाजी विद्यापीठात एआययू, संगणकशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोनदिवसीय 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सवाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. एआययूच्या सहायक संचालक डॉ. उषा राय नेगी, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. निकालामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठांनी आघाडी नोंदविली.

डॉ. पाणी म्हणाले, अन्वेषण संशोधन महोत्सवातून दर्जेदार संशोधने साकार झाली आहेत. स्पर्धेची व्याप्ती आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत वाढविण्यात येत आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते. समन्वयक डॉ. कविता ओझा यांनी प्रास्ताविक केले. अहवाल वाचन डॉ. कबीर खराडे यांनी केले. राजेंद्र अतिग्रे यांनी निकाल वाचन केले. तृप्ती भापकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजयकुमार कुंभार यांनी आभार मानले.

30 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकीय दृष्टिकोन रुजविण्यामध्ये 'अन्वेषण' उपयुक्त



**■ डॉ. अमरेंद्र पाणी, निकालात महाराष्ट्रातील विद्यापीठांची आघाडी**

**■ कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशभरातील तरुणाईमध्ये संशोधकीय दृष्टिकोन आणि सृजनशीलता यांना चालना देण्यामध्ये अन्वेषण संशोधन महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरतो आहे, हे या स्पर्धेला वर्षागणिक वाढत्या प्रतिसादामधून स्पष्ट झाले आहे, असे प्रतिपादन भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसंचालक व संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. अमरेंद्र पाणी यांनी केले. शिवाजी विद्यापीठात एआययू, संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय अन्वेषण विद्यार्थी संशोधन महोत्सव-२०२३च्या समारोप समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. निकालामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठांनी आघाडी नोंदविली.

डॉ. पाणी म्हणाले, आविष्कार संशोधन स्पर्धा वगळता देशात एकही संशोधन, नवसंशोधन वा नवोन्मेषाला प्रोत्साहन देणारी स्पर्धा नव्हती. ही उणीव दूर करण्यासाठी भारतीय विद्यापीठ महासंघाने अन्वेषण संशोधन महोत्सव देशभरात आयोजित करण्यास सुरवात केली.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, एखाद्या विषयावर संशोधन करीत असताना अनेक प्रश्नांची उत्तरे सहजरीत्या देतो. मात्र, सर्वसामान्यांच्या साध्यासोप्या प्रश्नांची उत्तरे तितक्या सहजपणे देता येत नाहीत, त्या प्रश्नांना भिडून त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न तरुण संशोधकांनी भावी आयुष्यात करावा.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कविता ओझा, डॉ. कबीर खराडे, राजेंद्र अतिग्रे, तृप्ती भापकर, डॉ. विजयकुमार कुंभार आदी उपस्थित होते.

पश्चिम विभागामधील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान या पाच राज्यांतील ११ विद्यापीठांच्या १०८ संशोधक विद्यार्थ्यांनी महोत्सवात सहभाग घेतला. त्यांनी ६४ संशोधन प्रकल्प सादर केले. स्पर्धेचा अंतिम निकाल विभागनिहाय गुणानुक्रमे असा, सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे : प्रथमेश खेडकर (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), गौरव पांडे, ऋतुजा जगतकर, स्नेहा कुमारी, गिन्नी केवलरमाणी (मुंबई विद्यापीठ), हर्षाली राठोड, शिवानी नरसीकर, प्रेम बिडवे (एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर).

आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे : सोपान नांगरे, (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), मानस महाले (मुंबई विद्यापीठ), अनुष्का शिंदे, श्रेया लोहकरे, निखिल मराठे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ).

मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान : सर्गुण बासराणी (डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर), अवंती पुराणिक, श्रावणी निघोत, प्रज्ञा मगदूम (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), सुरजीत अडगळे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान : लीना चौधरी (डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर), टोनी थॉमस, जस्टिना चतुर्वेदी, राझी शेख (डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई), दीपकुमार पटेल, मानन पटेल, झील पटेल, हिलाय पटेल (गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात).

कृषी व संलग्न क्षेत्रे : ओम यादव (मुंबई विद्यापीठ), शंकर मोरे, साईनाथ सूर्यवंशी (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), भाविक चौधरी, ध्रुव सोनी, मितकुमार पटेल, साहील अमीन (गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात).

आंतरविद्याशाखीय संशोधन : नामदेव ठोंबरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), संकेत पवार, दीपांशु शर्मा (एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर), तेजस पाटील (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव).

30 DEC 2023
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन महोत्सवाची शुक्रवारी सांगता झाली. यावेळी विविध गटांतील विजेत्यांसमवेत भारतीय विद्यापीठ महासंघाचे डॉ. अमरेंद्र पाणी, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. उषा राय नेगी, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कविता ओझा आदी उपस्थित होते.

# संशोधनात महाराष्ट्रातील विद्यापीठांची आघाडी

## 'अन्वेषण'मध्ये बाजी ; शिवाजी विद्यापीठातील महोत्सवाची सांगता

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठात संगणकशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि भारतीय विद्यापीठ महासंघातर्फे आयोजित दोन दिवसीय पश्चिम विभागीय 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सवाची आज सांगता झाली. त्यात निकालात महाराष्ट्रातील विद्यापीठांनी आघाडी मिळविली.

या महोत्सवात पश्चिम विभागामधील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान या पाच राज्यांतील ११ विद्यापीठांच्या एकूण १०८ संशोधक विद्यार्थ्यांनी महोत्सवात सहभाग घेतला.

या महोत्सवाअंतर्गत झालेल्या स्पर्धेतील विजेत्यांमध्ये सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे : प्रथमेश खेडकर (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), गौरव पांडे, ऋतुजा जगतकर, स्नेहा कुमारी, गित्री केवलरमाणी (मुंबई विद्यापीठ), हर्षाली राठोड, शिवानी नरसीकर, प्रेम बिडवे (एम.जी.एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर). आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे : सोपान नांगरे, (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव), मानस महाले (मुंबई विद्यापीठ), अनुष्का शिंदे, श्रेया लोहकरे, निखिल मराठे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ). मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान : सर्गुण बासराणी (डी. वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर), अवंती पुराणिक, श्रावणी निघोत, प्रज्ञा मगदूम (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), सुरजित घनश्याम अडगळे (शिवाजी विद्यापीठ). अभियांत्रिकी व तंत्रज्ञान : लीना चौधरी (डी. वाय. पाटील विद्यापीठ), टोनी थॉमस, जस्टिना चतुर्वेदी, राझी शेख (डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी मुंबई), दीपकुमार पटेल, मानन पटेल, झील पटेल, हिलाय पटेल (गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात). कृषी व संलग्न क्षेत्रे : ओम यादव (मुंबई विद्यापीठ), शंकर मोरे, साईनाथ सूर्यवंशी (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड), भाविक चौधरी, ध्रुव सोनी, मितकुमार पटेल, साहील अमीन (गणपत युनिव्हर्सिटी). आंतरविद्याशाखीय संशोधन : नामदेव ठोंबरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), संकेत पवार, दीपांशु शर्मा (एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर), तेजस पाटील (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ) यांचा समावेश आहे.

या विजेत्यांना एआययूचे सहसंचालक डॉ. अमरेंद्र पाणी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

यावेळी एआययूच्या सहाय्यक संचालक डॉ. उषा राय नेगी, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते. महोत्सवाच्या समन्वयक डॉ. कविता ओझा यांनी स्वागत केले. अहवाल वाचन डॉ. कबीर खराडे यांनी केले. राजेंद्र अतिग्रे यांनी निकाल वाचन केले. तृप्ती भापकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजयकुमार कुंभार यांनी आभार मानले.

> 'तरुणाईमध्ये संशोधकीय दृष्टिकोन आणि सृजनशीलता यांना चालना देण्यामध्ये अन्वेषण संशोधन महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरत आहे. शिवाजी विद्यापीठाने या स्पर्धेचे यजमानपद अत्यंत यशस्वीरित्या पार पाडले आहे.
>
> **- डॉ. अमरेंद्र पाणी**, संचालक, एआययू

> 'सर्वसामान्यांच्या ज्या साध्यासोप्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला तितक्या सहजपणे देता येत नाहीत, त्या प्रश्नांना भिडून त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न तरुण संशोधकांनी भावी आयुष्यात करावा.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 DEC 2023
लोकमत

# श्रीरंग उमराणी यांची प्रकट मुलाखत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभाग व मनोबल व्यसनमुक्ती केंद्र यांच्यावतीने ज्येष्ठ समुपदेशक, संगीत दिग्दर्शक श्रीरंग उमराणी यांची व्यसनाधीनता या विषयावर १ जानेवारीला प्रकट मुलाखत आयोजित केली आहे. विद्यापीठातील भाषा भवन सभागृहात संध्याकाळी ४:०० वाजता हा कार्यक्रम होणार असून, प्रा. शिरीष शितोळे मुलाखत घेणार आहेत.

लोकमत

# विद्यापीठात ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : ग्राहक पंचायत व शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्यावतीने राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्ताने जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष बी. जे. पाटील यांनी जिल्ह्यातील कामाचा आढावा घेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आजीवन व अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार यांनी ग्राहक पंचायतीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी सुनीता नेर्लीकर यांनी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अरुण वाघमारे, प्रा. एस. एन. पाटील, सुनीता राजेघाडगे, सर्जेराव जाधव, अनुपम गुप्ता उपस्थित होते. सुरेश माने व पूनम देसाई यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुकूमार नरंदेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 DEC 2023
पुढारी

# हिरकणी कक्ष स्थापनेचे आदेश कागदावरच..!

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

गर्भवती महिला व स्तनदा मातांसाठी सरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्था, बसस्थानक आणि रेल्वेस्थानकांवर हिरकणी कक्ष असतो. याच्या माध्यमातून बालकांचे कुपोषण व आजाराने होणारे बालमृत्यू हा उद्देश आहे. मात्र, शिवाजी विद्यापीठासह संलग्न २५० हून अधिक महाविद्यालयात फक्त ११ ठिकाणी हिरकणी कक्ष आहेत. महाविद्यालयांनी शासनाच्या निर्णयास हरताळ फासला असून हिरकणी कक्ष प्रत्यक्षात कागदावरच राहिला आहे.

- **शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत उदासीनता; केवळ ११ हिरकणी कक्ष स्थापन**



काही दिवसांपूर्वी एका महिला आमदाराने हिरकणी कक्षाच्या दुरवस्थेबाबत केलेल्या तक्रारीमुळे राज्यभरातील बसस्थानके, रेल्वे स्थानकांवरील हिरकणी कक्षांची तपासणी करण्यात आली. त्यानंतर राज्य सरकारने मोठे पाऊल उचलत अशा प्रकारचा कक्ष सर्व कार्यालयांमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. शैक्षणिक संस्थांसह सर्व आस्थापनांमध्ये गर्भवती व स्तनदा मातांसाठी विशेष कक्ष उभारणे गरजेचे आहे. त्यामुळेच हा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शिवाजी विद्यापीठात २००७ पासून पाळणाघर सुरू आहे. याठिकाणी हिरकणी कक्षाप्रमाणे सुविधा पुरविण्यात येतात. तसेच विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये हिरकणी कक्ष स्थापन केला आहे.

"

शैक्षणिक संस्थांमध्ये महिलांची गरज लक्षात घेऊन तातडीने हिरकणी कक्ष स्थापन केले पाहिजेत. त्याठिकाणी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

**- स्वागत परुळेकर,** व्यवस्थापन परिषद सदस्य, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 DEC 2023
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ हॉकी संघात महाराष्ट्र क्रीडा मंडळ कोल्हापूरच्या ९ खेळाडूंची निवड झाली आहे. हा संघ मध्य प्रदेश (भोपाळ) येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. संघात रोहन पाटील, महेश पाटील, वैभव पाटील, पारस पाटील, अनिरुद्ध पाटील, तन्मय जाधव, हर्षवर्धन जाधव, स्वप्नील कुऱ्हाडे, करण तळप यांचा समावेश आहे. सर्वांना संघटक विजय साळोखे-सरदार, नजीर मुल्ला, योगेश देशपांडे, संतोष चौगले, सागर जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.